# अमरावतीत हुडहुडी : थंडीचा प्रभाव वाढला

## विभागातील अकोला उणे 14 अंश सेल्सीअसवर



| जिल्हा | तापमान (उणे) |
|---|---|
| अमरावती | 15.5 |
| अकोला | 14.0 |
| बुलडाणा | 14.3 |
| वाशिम | अप्राप्त |
| यवतमाळ | अप्राप्त |

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)** - सध्या राज्यामध्ये तापमानामध्ये चढ-उतार अनुभवायला मिळत आहे. सोमवारी (दि.25) नागपूरच्या हवामान विभागाने अमरावतीमध्ये 15.5 अंश सेल्सीयस रात्रीच्या तापमानाची नोंद झाली आहे. गेल्या 24 तासात दुपारच्या तापमानातील चटका कमी झाला असून 30.6 अंश सेल्सीअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यातील तापमान उणे 14 अंश सेल्सीअसवर पोहोचले आहे.

हवामान विभागानुसार पुढील काळामध्ये देखील राज्यातील अनके भागातील तापमानात चढ-उतार पाहायला मिळणार आहे. तर काही ठिकाणी थंडीचा कडाका वाढेल, असा इशारा देण्यात आला. राज्यावर हवेचा दाब निर्माण झाल्याने थंडीत चढ-उतार होत आहे. हवेच्या दाबामध्ये वाढ होताच किमान व कमाल तापमानात घट होऊन थंडीची तीव्रता वाढत आहे. ईशान्येकडून येणारे थंड वारे थंडीची तीव्रता अधिक वाढवणार आहेत, असाही अंदाज देण्यात आला. अमरावती विभागात हवामान कोरडे व थंड राहणार असून, सकाळी धुके पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांशी भागात थंडीचा कडाका जाणवत आहे. अनेक ठिकाणी तापमान 15 अंशांपेक्षाही कमी आहे. तर 13 अंशांपेक्षा कमी तापमान असलेल्या ठिकाणांचीही संख्या लक्षणीय आहे. यंदा थंडीचा जोर उशिराचा सुरु झाला आहे. दिवाळीपूर्वीची थंडीचा प्रभाव दरवर्षी वाढते. परंतू यंदा दिवाळी आटोपल्यानंतर नोव्हेबर महिना अर्धाअधिक उलटून गेल्यावर गुलाबी थंडीचे आगमण झाले. 25 नोव्हेबर रोजीची 15.5 डीग्री सेल्सीअस तापमानाची नोंद झाली असून, थंडीचा जोर वाढलेला आहे.

### उबदार कपडे निघाले बाहेर

दरवर्षी दिवाळीपूर्वीच थंडी सुरु होते. परंतू यंदा थंडी उशिरा सुरु झाली आहे. त्यामुळे आतापर्यंत उबदार कपड्याची आवश्यकता वाटली नाही. परंतू आता गेल्या तीन दिवसांपासून थंडीचा प्रभाव हळूहळु वाढू लागला आहे. त्यामुळे स्वेटर, जर्किन, मफलर, टोप्या अशा आदी उबदार कपडे कपाटातून बाहेर निघाले आहे.

# रोहीत पाल हत्या प्रकरणातील तिसरा आरोपी अटक

## पोलीस आयुक्तांचे स्पेशल स्कॉडची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.25)** - गाडगेनगर हद्दीतील शोभानगरात झालेल्या रोहीत पाल याच्या हत्याप्रकरणातील तिसऱ्या आरोपीला अटक करण्यात पोलीस आयुक्तांच्या स्पेशल स्कॉटला 25 नोव्हेबर रोजी यश मिळाले. मयूर किशोर सोळंके (20, रा. जुना कॉटन मार्केट, चौधरी चौक, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याला गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

पोलीस आयुक्त साहेबांचे स्पेशल स्कॉड 25 नोव्हेबर रोजी सकाळी 10 वाजतापासून संपूर्ण आयुक्तालय पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान त्यांना गुप्त माहिती मिळाली की, गाडगेनगर हद्दीत झालेल्या रोहीत पाल याच्या हत्येच्या गुन्ह्यातील फरार आरोपी मयूर किशोर सोळंके हा चांगापूर परिसरात लपून बसलेला आहे. या माहितीवरून स्पेशल स्कॉडने सदर ठिकाणी जाऊन आरोपीचा शोध घेतला असता सदर तो चांगापुर परिसरात मिळून आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईकरीता गाडगे नगर पोलिसांच्या ताब्यात दिले. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, उपायुक्त सागर पाटील, गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सहा. पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात स्पेशल स्कॉड प्रभारी पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, पोलिस हवालदार छोटेलाल यादव, इशय खांडे, मंगेश लोखंडे, पोलीस अंमलदार आशिष डवले, रंजित गावंडे, अमोल मनोहर, निवृत्ती काकड, चालक गजानन सातंगे, सुरज गाडे यांनी केली.

# इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि. 25)** - फेब्रुवारी-मार्च 2025 मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे,नागपूर,छत्रपती संभाजी नगर,मुंबई,कोल्हापूर,अमराव ती,नाशिक,लातूर व कोकण यांना विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र 12 वी व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र 10 वी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र 12 वी परीक्षा सर्वसाधारण व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा,लेखी व प्रात्यक्षिके परीक्षेचा कालावधी मंगळवार दि. 11 फेब्रुवारी ते मंगळवार दि. 18 मार्च 2025 असा राहील. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच (एन.एस.क्यु.एफ) अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी शुक्रवार दि. 24 जानेवारी सोमवार 10 फेब्रुवारी 2025 असा राहील. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र 10 वी परीक्षेचा कालावधी शुक्रवार दि.21 फेब्रुवारी ते सोमवार दि. 17 मार्च 2025 असा राहील. प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा सोमवार दि. 3 फेब्रुवारी ते गुरुवार 20 फेब्रुवारी 2025 असा राहील.

सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www. mahahsscbord.in या अधिकृत संकेतस्थळावर 21 नोव्हेंबर 2024 पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा- उच्च माध्यमिक शाळा- कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. यासंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी, असे राज्य मंडळ पुणेचे सचिव देविदास कुलाळ यांनी आणि अमरावती मंडळाकडून कळविण्यात आले.

# पकड वॉरंटमधील दोन महिलांसह आठ लोकांना अटक



## मोर्शी पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)**- न्यायालयीन तारखेवर हजर न झालेले पकड वॉरंटमधील दोन महिला व सहा पुरुष आरोपींना मोर्शी पोलिसांनी 25 नोव्हेबर रोजी विविध परिसरातून अटक केली. या आठही आरोपींना न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले होते.

पोलीस अधिक्षक यांनी विधानसभा निवडणुकीच्या आचार संहीता अनुषंगाने जास्तीत जास्त वॉरंटवहील आरोपींना अटक करण्याबाबत आदेश दिले हाते. त्यानुसार मोर्शी पोलिसांनी 25 नोव्हेबर रोजी पहाटे पहाटे पकड वॉरन्ट तामील संबंधाने विशेष मोहीम राबविली. या विशेष मोहीम दरम्यान मोर्शीत राहणारे व बरेच वर्षापासुन न्यायालयात तारखेवर हजर न झालेले पकड वॉरन्टमधील 6 पुरूष व 2 महीला आरोपी असे एकुण 8 आरोपींना अटक करण्यात आली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, मोर्शी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक आकाश शिवनकर, एएसआय रवी तायडे, पोलिस हवालदार सुनिल गावडे, श्यामसिंग चुंगडा, विजय वागतकर, मंगेश श्रीराव, गोपाल घाटे, स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते व विद्या कावरे यांनी केली आहे.

# हॉटेलमध्ये नेऊन मुलीचा विनयभंग

**अमरावती** - दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 27 वर्षीय तरुणीच्या कुटुंबीयांनी तिचा विवाहाचा बायोडेटा सोसायटीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर टाकला होता. त्यावर मुलीच्या कुटुंबीयांनी समरजीतसिंग राजेंद्र परिहार (रा. इंदूर, मध्य प्रदेश) यांच्याशी बोलणे सुरू केले. समरजितसिंग हे कुटुंबीयांसह मुलीच्या गावी तिला पाहण्यासाठी आले होते. त्यानंतर आपल्याला एकटे बोलायचे आहे असे सांगून त्याने तिला हॉटेलमध्ये नेले आणि तिचा विनयभंग केला. तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी समरजितसिंग राजेंद्र परिहार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# रेती वाहून नेणाऱ्या डंपरच्या धडकेत एकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.25)** - शेतात पायदळ जात असलेल्या 60 वर्षीय इसमाचा भरधाव अनियंत्रीत रेतीच्या डंपरने दिलेल्या धडकेत मृत्यू झाला. ही घटना 25 नोव्हेबर रोजी दुपारच्या सुमारास पुसला येथे घडली. अपघात झाल्याचे कळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली परंतु इसमाचा घटनास्थळावरच मृत्यू झाला होता. सुखदेव गजबे असे मृत्यूमुखी पडलेल्या इसमाचे नांव असून तो पुसला येथीलच रहिवाशी आहे.

सविस्तर माहीतीनुसार, दुपारच्या सुमारास पुसला येथील भवानी नगर परिसरातील रहिवाशी असलेले सुखदेव रामाजी गजबे हे शेतात जाण्याकरीता घरुन निघाले होते. ते बसस्थानक परिसरात वरुडहून पांढूर्णाकडे जात असताना त्यांना एम.एच27 बीएक्स 9499 या क्रमांकाच्या भरधाव व अनियंत्रीत डंपरने जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहीती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळ गाठले. त्यानंमतर घटनास्थळावर पोलिसांना पाचारण करण्यात आले. घटनास्थळावरुन डंपर चालकाने पळ काढीत डंपर थेट शेंदुजनाघाट पोलिस स्टेशनला पोहचविल्याचे कळते. या प्रकरणी शेंदुरजनाघाट पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होता.

# रानडुक्कर आडवे आल्याने कारचा अपघात

## पाच जण किरकोळ जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)**- भरधाव कारसमोर अचानक रानडुक्कर आडवे येवून झालेल्या अपघातात पाच जण किरकोळ जखमी झाले आहेत. सदर घटना दर्यापूर-अमरावती रोडवरील जसापूर फाट्याजवळ सोमवार, (दि.25) सकाळी 11 वाजताच्या सुमारास घडली आहे.

येवदा येथील कला, वाणीज्य विद्यालयात नौकरीवर असलेले पाच प्राध्यापक दररोज एम.एच.27 बी.झेड.0846 या क्रमांकाच्या कारने अमरावती ते येवदा अपडाउन करतात. दरम्यान सोमवारी सकाळी ते अमरावती येथून येवदा कारने जात असताना खल्लार नजीकच्या जसापूर फाट्यावर अचानक रानडुक्कर आडवे आले आणि कारचालकाचे स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार रस्त्यालगत असलेल्या पुलाची संरक्षण भींत तोडून शेतात जाऊन उलटली. या अपघातात कारमधील पाचही जण जखमी झाले आहे. जखमींना पुढील उपचाराकरीता अमरावती रेफर करण्यात आले होते.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदारांचा केला सत्कार

## अनिल बोंडे, रवी राणांसह सर्व नवनिर्वाचित आमदारांची उपस्थिती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)**- देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई येथे सागर बंगलावर जाऊन राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे आणि सलग चौथ्यांदा रेकॉर्ड मताने विजयी आमदार रवी राणा यांनी भेट घेतली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित आमदार रवी राणा (बडनेरा), आमदार प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), आमदार प्रवीण तायडे (अचलपूर), आमदार राजेश वानखडे (तिवसा), आमदार केवलराम काळे (मेळघाट) आणि आमदार उमेश उपाख्य चंदु यावलकर (मोर्शी) शाल- पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला. यावेळी अमरावती जिल्हा भाजप अध्यक्ष व राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा यांचे अमरावती जिल्हा कांग्रेस मुक्त केल्याबद्दल अभिनंदन केले. डॉ अनिल बोंडे आणि रवी राणा यांनी देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत. अश्या शुभेच्छा दिल्या.

# लग्न सराईच्या तोंडावर सोने स्वस्त, भाव 3000 ने उतरला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.25)** - ऐन दिवाळीत 81 हजारांपर्यंत पोहोचलेल्या सोन्याचा दर आता हळूहळू कमी होत आहे. मागील पंधरा दिवसांमध्ये तब्बल साडेचार हजार रुपयांनी सोन्याचा दर खाली आला. आता लवकरच लग्न सराईचा हंगाम सुरू होणार आहे. त्यामुळे आपल्या काळजाच्या तुकड्यासाठी सोने घेणे स्वस्तात पडणार आहे.

लग्नसराईत गरीब असो वा श्रीमंत. प्रत्येकांकडून सोन्याचे दागिने कमी- अधिक प्रमाणात का होईना खरेदी केले जातात. प्रत्येक आईवडील आपल्या लाडक्या लेकीसाठी आणि होणाऱ्या जावईबापूसाठी सोन्याचे दागिने घेण्याला प्राधान्य देतात. यासाठी कर्ज काढायचे काम पडले तरी आईवडील मागे-पुढे पाहत नाहीत. बरेचदा लाडक्या लेकीला भेट म्हणूनही सोन्याचे दागिने दिले जाते. ग्रामीण भागात ज्यांच्याकडे विवाह प्रसंग असतो, ते आधीच सोने-चांदीचे दागिने खरेदी करतात. शेतकऱ्यांना चांगले पिकले तर सोने खरेदीमध्ये उलाढाल पहायला मिळते. यावेळी शेतकऱ्यांची परिस्थिती फार नाजूक आहे. भावही अपेक्षित मिळालेला नाही. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत आहे. अनेकदा शेतकरी अपेक्षित उत्पन्न न झाल्यास आपल्या लेकीचा विवाह पुढे ढकलतात.



**पुन्हा भाव वाढणार, 85 वर जाणार ?**

ज्यावेळी सोन्याची मागणी वाढते, त्यावेळी किमतीही वधारतात. आता सोन्याचे भाव कमी होत असले तरी येणाऱ्या काळातील लग्नसराई लक्षात घेता सोन्याचे भाव वाढण्याची शक्यता आहे. आता कमी झालेले भाव 85 हजारांवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### पोत, बोरमाळ, मोहनमाळची चलती

बिगरडागी सोने खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसून येतो. यामध्ये गोफ, बांगडी, अंगठी, पाटल्या या या वस्तूंचा समावेश असतो. यासोबतच पोत, फॅन्सी बोरमाळ, मोहनमाळ, राणी हार आदींना मागणी आहे.

### ट्रम्प जिंकले अन् सोने उतरले

अमेरिकेच्या राष्ट्रपती पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांच्या पक्षाला बहुमत मिळाले. नियोजित राष्ट्रपती म्हणून ट्रम्प यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे शेअर बाजारात मोठी उलथापालथ झाल्याचे दिसून येते.

### नियोजित वधू-वर सराफा दुकानात

दिवाळी झाल्यानंतर विवाहासाठी मुले आणि मुली पाहणे सुरू केले जाते. लग्न जुळल्यानंतर वर आणि वधूसाठी सोन्याचे दागिने खरेदी केले जातात. त्यामुळे आता नियोजित वर-वधू सराफा दुकानात दिसून येत आहेत.

# अडसड कुटूंबियांची राज्यपालांकडून भेट



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)**- राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आज अरुणभाऊ अडसड यांच्या कुटुंबियांना सदिच्छा भेट दिली.

राज्यपाल बागडे यांनी गनेडीवाल ले-आउट येथील अडसड यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी माजी आमदार अरुण अडसड यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. अडसड कुटुंबियांच्या वतीने बागडे यांचे औक्षवण करण्यात आले. तसेच शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या भेटीनंतर ते नागपूरकडे रवाना झाले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ग्रामीण रुग्णालयात आरोग्यसेवेची हेळसांड

## स्त्रीरोग तज्ञांची गरज | डॉक्टरांची गरज, मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी होईल मदत



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.25 )**– मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य विभागाकडून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात आहे, तरी सुद्धा मेळघाटात दरवर्षी बालमृत्यू, मातामृत्यू होत आहे. याला मुख्य कारण म्हणजे तज्ञ डॉक्टरांकडून वेळेवर न मिळणारे मार्गदर्शन तथा उपचारात होणारे विलंब सध्या मेळघाटातील चिखलदरा ग्रामीण रुग्णालयात मागील कित्येक वर्षांपासून स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टर नसल्याने येथील महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. परिणामी मेळघाटात मातामृत्यूचे प्रमाण काही करून कमी होताना दिसत नाही. मेळघाटातील महिलांच्या आरोग्याचे प्रश्न पाहता या ठिकाणी स्त्री रोग तज्ज्ञाची अत्यंत गरज आहे, मात्र प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

मेळघाटातील कुपोषण सन 1993 मध्ये देशाच्या समोर आले. तेव्हापासून बालमृत्यू, मातामृत्यूचा लागलेला कलंक काही करून पुसल्या जात नाही. आरोग्य विभागाकडूनसुद्धा विविध प्रकारच्या योजना राबवित करोडो रुपये खर्च करत आहे, तरी सुद्धा दरवर्षी बालमृत्यू, मातामृत्यू होत असल्याचे दिसून येत आहे. यामागचे खरे कारण काय हे कोणाच्याच लक्षात येत नाही. केवळ मृत्यू झाले की चौकशी लावून मोकळे होतात. मात्र कारणाच्या मुळाशी जात नाही, त्यामुळे एका मागून एक बालमृत्यू, मातामृत्यू होत आहे. याला मुख्य कारण तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा हे सुद्धा एक आहे. मात्र याकडे शासन प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. सध्या मेळघाटच्या चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयात मागील कित्येक वर्षांपासून कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली नाही. परिणामी येथील महिलांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाकडून दुधावरची भूक ताकावर भागवण्याचा प्रकार सुरू आहे. वर्षातून एखाद्या महिन्यात पंधरा-पंधरा दिवस स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येते, मात्र ते सुद्धा डॉक्टर नावापुरते येतात. परिणामी महिलांच्या निर्माण झालेल्या समस्येवर वेळेवर निदान करून उपचार करण्यास विलंब होत असल्याने मातामृत्यूचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. पंधरा-पंधरा दिवसासाठी येणाऱ्या डॉक्टरांची काम करण्याची इच्छा नसते, केवळ प्रशासनाने नियुक्ती केली म्हणून रुजू होतात आणि आरोग्य केंद्रात बसून राहतात. काही डॉक्टर तर ठरलेल्या तारखेला रूजु न होता कधीही येतात अन कधीही जातात परिणामी या डॉक्टरांचा उपयोग मेळघाटला होतांना दिसत नाही. खरोखरच जर मेळघाटातील मातामृत्यू, बालमृत्यू कमी करायचे असेल तर ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी स्त्रीरोग तज्ञ आणि बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करने गरजेचे झाले आहे.

> ग्रामीण रुग्णालयाला तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता आहे, पण मेळघाटात तज्ञ डॉक्टर नियुक्ती झाल्यावरही रुजू होत नाही. त्यामुळे शासनाच्यावतीने मेळघाटात तज्ञ डॉक्टरांना डेप्युटेशन देण्यात येते.
>
> **डॉ. दिलीप सौंदळे,**
> **जिल्हाशल्य चिकित्सक, अमरावती.**

# राज्यात 21 व्या पशूगणनेस सुरवात

## पशूपालकांनी पशूगणनेस सहकार्य करावे-जिल्हाधिकारी

### माहिती पुस्तिकेचे विमोचन





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** – आजपासून राज्यातील पशूगणनेला सुरवात झाली आहे. सांख्यिकी माहितीसाठी ही पशूगणना अचूक होणे आवश्यक आहे. त्यामुळे पशूगणनेसाठी पशूपालक, गौशाळाचालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची सभा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, जिल्हा पशूसंवर्धन उपआयुक्त डॉ.संजय कावरे, महानगरपालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, परिवहन विभागाचे सिद्धार्थ ठोके यांच्यासह अशासकीय सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार यांनी, पशूची सांख्यिकी माहिती व्हावी, यासाठी दर पाच वर्षांनी पशूगणना होते. यासाठी प्रगणकाची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी पशूपालकांनी सहकार्य करावे, तसेच जिल्ह्यात जनावरांचे 100 टक्के रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे. तसेच अशासकीय सदस्यांना कामकाजासाठी कार्यालयात जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच बँक खातेही उघडण्यात आले आहे. त्यामुळे समितीचे कामकाज करणे सुलभ होणार आहे. पोलिस विभागातर्फे गेल्या कालावधीत पकडलेल्या जनावरांची माहिती सादर करण्यात आली. यात 586 जनावरे जप्त करण्यात आली असून 65 जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी जप्त केलेली जनावरे नोंदणीकृत असलेल्या गौशाळेत देण्यात यावी. यामुळे त्यांचे पोषण योग्यप्रकारे होण्यास मदत मिळेल. नोंदणी केलेल्या गौशाळांना 20 लाख रूपये अनुदान आणि प्रती जनावरामागे प्रतिदिन 50 रूपये अनुदान मिळणार आहे. पोलिसांनी गौवंश वाहतूक केलेली वाहने जप्त करून परिवहन विभागाच्या मदतीने वाहनाचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करावी. तसेच वन विभानानेही त्यांच्याकडील पकडलेली जनावरे नोंदणीकृत गौशाळेला देण्याची कार्यवाही करावी, असे सांगितले. यावेळी उपस्थितांच्या हस्ते माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

# बालकांचे बँकखाते आधार सिडिंग करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** – महिला व बाल विकास विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपण योजना राबविण्यात येते. या योजनेच्या लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे लाभ देण्यात येणार आहे. यासाठी लाभार्थ्यांनी बालकांचे बँकखाते आधार सिडिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेचा लाभ प्राप्त होत असलेल्या दहा वर्षाच्या आत असलेल्या बालकांचे पालकांसोबत संयुक्त खाते उघडून सदर खात्याशी बालकाचा आधार क्रमांक सिडिंग करावा. तसेच बालकांचे वय दहा वर्षापेक्षा अधिक असल्यास स्वतंत्र बँक खाते उघडून आधार क्रमांक सिडिंग करावा. बालकाचा आधार क्रमांक बँक खात्याशी सिडिंग नसल्यास सदर योजनेचा लाभ जमा होणार नाही, याची लाभार्थ्यांच्या पालकांनी नोंद घ्यावी. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, महिला व बाल विकास भवन, राणी दुर्गावती चौक, गर्ल्स हायस्कुलजवळ, अमरावती येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांनी केले आहे.

# दर्यापूर बाजार समितीमध्ये कापसाला 8 हजाराचा उच्चांकी दर!

## बहुप्रतिक्षित कापूस लिलावाला शुभारंभ



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.25 )**– कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाची विक्री हर्रास पध्दतीने व्हावी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अधिकाअधिक भाव मिळावा या प्रामाणिक हेतूने बाजार समिती संचालक मंडळाने निर्णय घेतला व आंतराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधत याच पद्धतीचा शुभारंभ खासदार बळवंत वानखडे व सुधाकर भारसाकडे यांच्या मार्गदर्शनात तसेच अॅड.श्रीरंग अरबट यांच्या हस्ते कापूस लिलावाला शुभारंभ करण्यात आला.

बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे यांनी शेतकरी वर्गाला केलेल्या आवाहनाला शेतकऱ्यांनी प्रतिसाद देत बाजार समिती यार्डवर आपल्या कापूस गाड्या आणून बाजार समितीला सहकार्य केले. सर्वप्रथम कापूस गाड्या ह्या बाजार समिती यार्डवर आणून त्याची नोंद करून टोकन वाटप करून बाजार समितीच्या वतीने कापूस विक्री करिता आणलेल्या सर्व शेतकरी बंधूंचा शाल व श्रीफळ, रोप देऊन सत्कार करण्यात आला. याचबरोबर कापूस खरेदी करणाऱ्या व्यापारी वर्गाचा देखील सत्कार करण्यात आला. कापूस हर्रास झाल्यानंतर बाजार समितीची सौदापट्टी घेऊन गाड्या जिनिंगवर मोज मापाकरिता पाठविण्यात आल्या. यावेळी कापसाला रुपये 8 हजार उच्चांकी भाव मिळाला तर सरासरी 7450 ते 7521 पर्यंत भाव खुल्या बाजारात मिळाला. यावेळी शुभारंभाचे उदघाटन अॅड.श्रीरंग अरबट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे, बाजार समितीचे उपसभापती राजू कराळे, बाजार समितीचे संचालक बाळासाहेब हिंगणीकर, संचालक बाळासाहेब वानखडे, संचालक कांचनमाला गावंडे, संचालक साहेबराव भदे, संचालक गजाननराव देवतळे, संचालक राजेंद्र वढाळ, संचालक भारत आठवले, संचालक अनिल भारसाकडे, संचालक सुनिल डिके, डॉ. अभय गावंडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# नानागुरू महाराज पुण्यतिथी महोत्सवात भक्तांचे लोटांगण



## महाप्रसादाचा कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**शिरखेड,( दि.25 )** – तालुक्यातील शिरखेड येथे श्रीसंत नानागुरू महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला भाविकांची मांदियाळी जमली होती. यावेळी लोटांगण व महाप्रसादाचा कार्यक्रम नानागुरू महाराजांच्या जयघोषात उत्साहात पार पडला.

पुण्यतिथी निमित्त श्रीमद्भागवत कथेचे आयोजन 16 ते 22 नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले होते. हभप कैलास महाराज चांदूरकर यांच्या मधूर वाणीतून भाविकभक्तांनी कथा श्रवणाचा लाभ घेतला. या काळात दररोज सायंकाळी नानागुरू महाराज ग्रंथ पारायण व हरिपाठ तसेच भजनसंध्या आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात शिरखेड येथील जय भोले, विठ्ठल-रुक्मिणी, श्री ज्ञानेश्वर माऊली महिला भजन मंडळ, श्री गुणवंतबाबा खंजिरी भजन, अवधूत भजन मंडळ,

श्री मुक्ताई भजनी मंडळ सहभागी झाले होते. 23 नोव्हेंबर रोजी सकाळी हभप नीलेश महाराज तट्टे (शिरखेड) यांनी गोपाल काल्याचे कीर्तन सादर केले. यावेळी हभप नानाजी देशमुख (काटपूर) यांच्या हस्ते वैष्णव पूजन पार पडले. त्यानंतर नानागुरू महाराज मंदिरापासून काशी नदीपर्यंत भाविक भक्तांनी लोटांगण घातले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थिती दर्शविली. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला गावकरी व परिसरातील नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राम गोतमारेची वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिपसाठी तयारी

## 2025 मध्ये ट्रायलसाठी थायलंड ला जाणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )**– हरिकिसत मालू इंग्लिश स्कूलमध्ये आठवीत शिकणारा 14 वर्षीय राम मनिष गोतमारे याने राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त केल्यानंतर त्याची आता गोवा येथील नॅशनल पॅराऑलम्पिक स्विमिंग कॉम्पीटिशनसाठी निवड झाली आहे. यानंतर तो अमरावती विभागातून वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिप थायलैंड 2025 मध्ये होणाऱ्या स्पर्धेकरीता सिलेक्शन टायलकरिता सहभागी होणार आहे. त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अमरावती शहरातील रहिवासी असणारा राम मनिष गोतमारे याने 100 मीटर फ्रिस्टाईलमध्ये गोल्ड मेडल पटकाविले आहे. 100 मिटर बेस्ट्रोकमध्ये गोल्ड मेडल तर 200 मीटर फ्रि स्टाईलमध्ये सिल्वर मेडल मिळविले आहे. बालेवाडी येथील राज्यस्तरीय शालेय जलतरण क्रिडा स्पर्धेत 200 मिटर बेस्ट्रोक या क्रिडा प्रकारात तो सहभागी झाला आहे. आता चेन्नईच्या वेलाचेरी येथील वर्चुअस सायवस नॅशनल स्विमिंग कॉम्पीटिशनसाठी तो 3 ते 5 डीसेंबरपर्यंतच्या कालावधीत सहभागी होणार आहे. या स्पर्धेतून तो थायलंड येथील वर्ल्ड पॅरी चॅम्पीयनशिप या स्पर्धेमध्ये सिलेक्शन ट्रायलकरिता सहभागी होणार आहे. या यशाकरिता खेळाडुंनी शाळेतील मुख्याध्यापिका नीता कौसाकिया, पौर्णिमा सुरोजे, जयश्री गवळी आणि सर्वे शिक्षक, तसेच जलतरण प्रशिक्षक आशीष धर्माळे, पंकज हंबरडे, देवानंद घरडे, ऋत्वीका टाले आणि शिवाजी जलतरण संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव गावंडे आणि सुधाकर इंगोले यांचे आभार मानले आहे.



### इर्विन रुग्णालयातून महिलेचे वीस हजार लांबविले

**अमरावती**– श्वान दंशाच्या उपचारासाठी गेलेल्या महिलेची इर्विन रुग्णालयातून वीस हजार रुपये असलेली बॅग चोराने लांबविले. महिलेला बीसीचे वीस हजार रुपये मिळाले होते. ती रक्कम बॅक ऑफ इंडियात जमा करण्यासाठी महिला गेली होती. परंतू बॅक असल्याने महिला ती रक्कम भरू शकली नाही. अशातच महिलेला एका श्वानाने चावा घेतले. त्यामुळे त्या तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी गेल्या. दरम्यान चोराने त्यांच्याजवळील बॅग चोरून नेली.

# सुरळीत वीज पुरवठ्यासाठी ऑटोस्विच टाळा

## कृषिपंपांना कॅपॅसिटर बसविण्याचे महावितरणचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.25 )** – वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने ग्राहकांनी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत.

त्यामुळे परिसरातील सर्व कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान टळावे तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या अमरावती परिमंडलाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शेतात जाणे टाळण्याकरिता ऑटोस्विच

राज्यात 45 लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून या शेतकऱ्याना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. हा वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकर्यांडनी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावले आहेत. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाचवेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकर्यांकनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकर्यांरनी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावू नये तसेच इतर शेतकर्यांयनी ते लावले असल्यास ते काढून टाकण्याची विनंती करावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.


### कॅपॅसिटरची गरज का?

प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसविणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे कमी दाबाचा वीजपुरवठा, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. मात्र बहुतांश ग्राहकांनी कृषिपंपास कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली आहे. त्यामुळे ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे. कृषिपंपास कॅपॅसिटर बसविल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात. पुरेशा दाबाने वीजपुरवठा मिळतो, कृषिपंप जळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच रोहित्रांवरील भार 30 टक्क्यांने कमी होऊन रोहित्र नादुरुस्तीचे व जळण्याचेही प्रमाणही कमी होते. यामुळे शेतकर्यांळना योग्य दाबाचा, अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळेल. या सर्वांचा लाभ शेतकर्यांना होणार असल्यामुळे त्यांनी 'कॅपॅसिटर'चा वापर करावा.

# मेळघाटात नोटांचा पाऊस

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.25 )** – राज्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर महायुतीच्या अभेद्य विजयाने सर्वानाच धक्का बसला आहे. आदीवासी बहुल क्षेत्रातील मेळघाट विधानसभा मतदार संघ अमरावती लोकसभा मतदार सघात विक्रमी मतदानाची टक्केवारी वाढवुन स्थानिक विजयी उमेदराच्या मताधिक्यासह सर्वाधिक नोटांचा पाऊसही बरसला.



मेळघाटातील मतदारानी बहुसंख्येने मतदान केंद्रावर मतदान करुन सर्वाधिक 71.75 टक्के मतदान केले. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी झाल्यावर सर्वाधिक 106854 मताधिक्याने महायुतीचा उमेदवार विजयी झाला. हा ही एक विक्रमच ठरला तर दुसरी कडे 16 उमेदवारांना नापसंत करुन 2462 मतदारांनी नोटाचा पर्याय वापरुन नाकारले. एकंदरीत नापसंतीचा पर्यायाचा(नोटा) वर्षाव केला.

जिल्ह्यातील मेळघाट विधानसभा मतदार संघात 2462 त्या खालोखाल दर्यापुर विधानसभा मतदार संघात 1003 नोटांचा वापर करण्यात आला. अमरावती वि.स. 856, बडनेरा 692, तिवसा 635, अचलपुर 298, धामणगाव 768, मोर्शी 758, एकंदरीत 7472 मतदारानी नापसंती दर्शविली.